# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे-४११००७

संदर्भ क्रमांक :- आरक्षण/ओ-२२/ १०८२

दिनांक:- २८/०९/२०१२

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय :- अपंग अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार शासकीय सेवेतील गट-अ, ब, क आणि ड मधील पदे अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासनाने उच्च व तंत्र शिक्षण नियंत्रणाखालील उच्च शिक्षण संचनालयाअंतर्गत येणा-या गट अ, ब, क व ड या पदांमध्ये अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय क्रमांक- अपंग २०११/(२२/११)/मशि-१ दि. १२ सप्टेंबर, २०१२ अन्वये आदेश दिलेले असून शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील पदांमधील अपंगासाठीची सुयोग्य पदे सुनिश्चित केलेली आहे सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे.

अपंग अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार स्वतंत्र बिंदूनामावली ठेवण्याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार व शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

कळावे,

आपला विश्वासू,

28/9/12
सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

Sir/MD/2012/Circular

**अपंग अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार**
**शासकीय सेवेतील गट-अ, ब, क आणि ड मधील**
**पदे अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : अपंग २०११/(२२/११)/मशि-१
दिनांक : १२.०९.२०१२.

वाचा : १) अपंग व्यक्ती (समान संधी ,सपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ (१९९६ चा क्र. १)
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही १०९८ प्र. क्रं. १२/१६ -अ दिनांक २ मे, १९९८.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र२००९/प्र.क.५,सुधार-३, दि. ३ ऑगस्ट, २०१०.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण-१०१०/प्र.क्र.८९०/१९, दि. १० जानेवारी, २०११.
५) शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.अपंग-२००६/(१६०/०६)/आस्था-२, दि.२ जुलै, २००८.
६) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. अपंग- २०११/(२२/११)/ मशि-१, दि. २४ जानेवारी, २०११.

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या आस्थापनेवरील गट अ, ब, क आणि ड च्या पदांमध्ये अपंग व्यक्तिसाठी आरक्षण ठेवण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक अपंग-२०११/(२२/११)/मशि-१, दि. २४.०१.२०११ अन्वये पदनिश्चिती करण्यात आली होती. तथापि, त्यामध्ये सर्व मंजुर पदांचा समावेश नसल्याने सुधारीत सर्व पदांचे समावेशन असणारा शासन निर्णय काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यामुळे दि. २४.०१.२०११ चा शासन निर्णय व शासन पुरकपत्र क्रमांक अपंग -२००६/१६०(भाग-२/०६)/आस्था-२, दि.१३ फेब्रुवारी, २००९ अन्वये करण्यात आलेले अपंग पदासाठीचे विहित आरक्षण अधिक्रमीत करुन सुधारीत प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे अपंगांसाठी आरक्षण विहित करण्याचा निर्णय शासन घेत आहे.:-

**शासन निर्णय :** उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या आस्थापनेवरील गट अ, ब, क आणि ड च्या पदांमध्ये अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवण्यासंदर्भात शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

अ) अपंग व्यक्ति (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३३ नुसार शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवर सरळसेवा भरतीसाठी अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग या अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी १ टक्का याप्रमाणे एकुण ३/ टक्के पर्यंत सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात यावे.

ब) अपंग व्यक्तिसाठी राखीव पदावर सरसकट ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणाऱ्या उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड केली जाते. सदर उमेदवार त्या पदावर त्याच्या अपंगत्वाच्या टक्केवारीवर काम करण्यास पात्र आहे किंवा नाही हे वैद्यकिय मंडळाने न ठरवता त्यांनी फक्त अपंगत्वाची टक्केवारी

नमुद करुन सर्वसाधारण वैद्यकिय तपासणीनुसार तो उमेदवार शारिरीकदृष्ट्या पात्र आहे किंवा नाही असे प्रमाणपत्रात नमुद करावे.

क) संबंधीतांकडून उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यावर अशा उमेदवारास शारिरीक पात्रतेसंदर्भात विहित केलेल्या वैद्यकिय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच अशा अपंग व्यक्तीची नियुक्ती करण्यात यावी.

२. गट क मधील "वाहन चालक" या पदाची कर्तव्य व जबाबदारी लक्षात घेता, "वाहन चालक" या पदास अपंग प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यापासून सूट देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या संदर्भांकित दि. १० जानेवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला निर्णय उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदांना देखील जसाच्या तसा लागू राहील.

३. हे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि. ३ ऑगस्ट, २०१० च्या आदेशान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक: २०१२०९०३१६०६१०२४०२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. बा. मयेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मंत्री/राज्यमंत्री (उ व तं शि) यांचे स्वीय सहाय्यक
५. निबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
६. निबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
७. प्रापोनेटरी ॲन्ड सिनियर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
१०. सर्व प्राचार्य / संचालक, शासकीय महाविद्यालये / संस्था
११. महालेखापाल - १.(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई
१२. महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर
१३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१४. सेवायोजन संचालनालय, मुंबई
१५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,
१६. सचिव, उ व तं शि, यांचे स्वीय सहाय्यक
१७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१८. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, उ व तं शि. विभाग, मंत्रालय
१९. निवड नस्ती - मशि-१

| | पदनाम | शारिरीक क्षमता (Physical requirement) | नियुक्तीसाठी पात्र अपंग प्रवर्गाची वर्गवारी (Categories of Disabled suitable for jobs) |
|---|---|---|---|
| | सहसंचालक | S.ST.W.RW.C.MF.SE. | OL.BL.OAL.B.LV.HH. |
| | सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (कला) | | |
| | मराठी | S.ST.W.H.C.RW | BL.OA.OL.OAL.B.LV. HH |
| | इंग्लिश | S.ST.W.H.C.RW | BL.OA.OL.OAL.B.LV. HH |
| | हिंदी | S.ST.W.H.C.RW | BL.OA.OL.OAL.B.LV. HH |
| | अरेबिक | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | फ्रेंच | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | उर्दू | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | पर्शियन | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | संस्कृत | S.ST.W.H.C.RW | BL.OA.OL.OAL.B.LV. HH |
| | गुजराती | S.ST.W.H.C.RW | BL.OA.OL.OAL.B.LV. HH |
| | पाली प्राकृत | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | इतिहास | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.HH |
| | भा. प्राचीन इतिहास | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | भूगोल | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.HH |
| | तत्वज्ञान | S. SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV. |
| | राज्यशास्त्र | S. SE. ST. C. BN. W. | OA. OL. BL. B. LV. |
| | मानसशास्त्र | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.HH |
| | समाजशास्त्र | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.B.LV.HH |
| | संगित | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.HH.B.LV |
| | अर्थशास्त्र | S.ST.W.H.C.RW | BLA.OL.HH.B.LV |
| | व्याकरणशास्त्र | S.ST.W.BN.SE.H.C | OA.OL |
| | बंकरी | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | लोकप्रशासन | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (विज्ञान) | | |
| | भौतिकशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | रसायनशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | जीवशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |

| | | | |
|---|---|---|---|
| | वनस्पतीशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | प्राणीशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | जीव रसायनशास्त्र | S.SE.ST.MF.KC.C | OL |
| | सूक्ष्म जीवशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | जैविक तंत्रज्ञान | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | भूगर्भशास्त्र | RW.ST.H.C. W. | BLA. OL. OA. HH. |
| | गणित | S.SE.ST.C. | BL.OA.OLB.LV |
| | इलेक्ट्रॉनिक्स | S.ST.W.BN.SE.H.CST.C.R W.W | OA.OLOA.OL |
| | सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक (वाणिज्य) | | |
| | वाणिज्य | ST.C.RW.W.SE.C.H. | OA.OL.B.LV.HH. |
| | संख्याशास्त्र | S.ST.SE.C.KC.BN | OA.OL.L |
| | अकौंटसी | ST.C.RW.W.SE.C.H. | OA.OL.B.LV.HH. |
| | मार्केटिंग | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | फायनान्स | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | कायदा | S.SF.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | व्यापारी कायदा | S.SE.W.BN.MF | OL.BL.OA.B.LV |
| | ह्युमन रिसोर्स | S.ST.W.BN.SE.H.C | OA.OL |
| | (सांख्यिकी)ऑपरेशन | S.ST.SE.C.KC.BN | OA.OL.L |
| | ग्रंथपाल | S.SE.RW.ST | OL.BL.OA.LV.HH |
| | मुख्य प्रशासन अधिकारी | S.C.W.SE.RW.ST. | OL.OA.B.LV.HH |
| | वरिष्ठ प्रशासन अधिकारी | S.C.W.SE.RW.ST. | OL.OA.B.LV.HH |
| | प्रशासन अधिकारी | S.C.RW.ST | OL.OA.BL.HH.B.LV |
| | गट ब | | |
| | कनिष्ठ अधिव्याख्याता | Bilateral hand activities should be adequate. | OA.OL.B.LV.HH. |
| | स्वीय सहायक | S.ST.BN.MF.RW. | OL.BL.OA.B.LV. |
| | कनिष्ठ प्रशासन अधिकारी/विशेष कार्य अधिकारी/ | S.RW.SE.MW.C. | OA.OL.BL.HH.B.LV. |
| | प्रबंधक | S.ST.SE.RW.H.C. | OA.OL.BL.LV |
| | अधीक्षक (नर्सिंग गट ब) | S.RW.SE.MW.C | OL.OA.BL.HH.B.LV |
| | अधीक्षक (वरिष्ठ श्रेणी) वस्तीगृह | S.RW.W.ST.BN.MF | OA.OL.BL.LV. |
| | अधीक्षक (सारासे गट ब) | S.RW.SE.MW.C | OL.OA.BL.H.B.LV |

| | | | |
|---|---|---|---|
| | गट-क | | |
| | निम्नश्रेणी लघुलेखक | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C. | OA.OL.BL.OAL.B.LV. HH |
| | अधिक्षक | S.RW.SE.MW.C. | OL.OA.BL.HH.B.LV. |
| | वसतिगृह अधिक्षक | S.RW.W.ST.BN.MF | OA.OL.BL.LV. |
| | सहायक अधीक्षक | S.ST.BN.SE.RW.H | BL.BLV.OA.OL.HH |
| | गृह प्रमुख | S.ST.BN.SE.RW.H | LV.OA.OL.HH |
| | ग्रंथपाल नि वॉर्डन | S.RW.W.ST.BN.MF | OA.OL.BL.LV. |
| | मुख्य लिपिक | S.ST.W.MF.SE.RW.C | OA.OL.BL.OAL.B.LV. HH |
| | वरिष्ठ लिपिक | S.ST.W.RW.H.C | OA.OL.BL.OAL.B.LV. HH |
| | लघुटंकलेखक | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C. | OA.OL.BL.OAL.B.LV. |
| | लिपिक-टंकलेखक | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C. | OA.OL.BL.OAL.B.LV. |
| | कनिष्ठ लिपिक | S.ST.W.MF.SE.RW.C | BL.OL.B.LV.HH |
| | ग्रंथालय लिपिक | S.ST.W.SE.RW.H. | OA.OL.OAL.BL.HH. |
| | ग्रंथपाल | S.BN.MF.SE.RW.C | OA.OL.OAL.BL.HH. |
| | सहाय्यक ग्रंथपाल | S.ST.W.SE.RW.H. | OA.OL.OAL.BL.HH. |
| | भांडारपाल | S.ST.W.L.PP.MF.SE.RW. | OL.HH. |
| | प्रयोगशाळा सहाय्यक | S.ST.W.BN.MF.SE.C.H | OA.OL.BL.HH. |
| | वाहन चालक | शा.नि. दि.१०.०१.२०११ अन्वये अपंग प्रवर्गाचे आरक्षण लागु करण्यापासून सूट. | |
| | दुरध्वनी चालक | S.ST.W.MF.SE.H.C | OA.OL.BL.B.LV |
| | तबला वादक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OL.BL.LV. |
| | वाद्य वादक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OL.BL.LV. |
| | पेटी वादक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OL.BL.LV. |
| | संगीत सहाय्यक | S.ST.BN.MF.SE.RW.H.C. | OA.OL.OAL.BL.B.LV. |
| | ग्रंथालय परिचर | S.ST.W.F.PP.L.KC.BN.MF. SE.H.RW. | OA.OL.BL.HH.LV. |
| | प्रयोगशाळा परिचर | S.ST.W.MF.SE.RW.H | OL.LV.HH |
| | पाळणा चालक | S.ST.H.MF | OA.OL.HH.LV |
| | स्वयंपाकी | S.ST.W.MF.SE.RW.H | OL.LV.HH |
| | दप्तरी | S.ST.W.PP.L.KC.SE.RW.C. MF | OA.OL.HH.LV.B |
| | नाईक | S.ST.W.PP.L.KC.SE.RW.C. MF | OA.OL.HH.LV.B |
| | शिपाई | S.ST.W.PP.L.KC.SE.RW.C. MF | OA.OL.HH.LV.B |
| | मजदूर | S.BN.MF.SE. | OA.BL.OL.LV.B |
| | वसतीगृह कर्मचारी | S.ST.PP.L.B.SE.H. | OL.HH.LV |
| | झेरॉक्स ऑपरेटर | S.ST.W.MF.BN.SE.RW.H.C | OL.BL.HH |
| | चौकीदार | ST.W.SE | OL.BL.HH |
| | ग्रंथालय सहाय्यंक | S.ST.W.F.PP.L.KC.BN.MF. SE.H.RW. | OA.OL.BL.HH.LV. |
| | पहारेकरी | ST.W.SE | OL.BL.HH |

| | | | |
|---|---|---|---|
| | भट्टी | BN.KC.MF.SE. | OL.LV.HH |
| | स्वच्छक सफाईगार | S.ST.W.L.PP.KC.SE.BN | OA.OL.HH.LV |
| | हमाल | S.ST.W.F.SE.H.RW | OL.HH.LV.B. |
| | आया | S.ST.W.F.PP.L.KC.B. | OL.HH.LV.B. |
| | मेड सर्वंट | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H. | OL.HH.LV. |
| | पंप कम माळी | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE.H. RW | OL.LV.HH. |

संक्षिप्त संज्ञा:- S= Sitting, BN=Bending, SE=Seeing, RW= Reading & Writing, C=Communication, MF=Manipulation By Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting, ST=Standing, W=Walking, BLA=Both Leg & Arm, BA=Both Arms, OL=One Leg, BL=Both Leg, OA=One Arm, OAL= One Arm &Leg, B=Blind, LV=Low Vision, H=Hearing, HH=Hearing Handicapped, BLV=Blind & Low Vision, VH=Visually Handicapped, MW= Muscular Weakness.